http://www.epitomejournals.com, Vol. 3, Issue 12, December 2017, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# 1857 नंतर ब्रिटिश सरकारचे भारतीय संस्थान विषयक धोरण : एक अभ्यास



प्रा. डॉ. संतोष शंकरराव इंगोले

श्री. तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान

महाविद्यालय वाशीम.

## ABSTRACT

इ.स.1857 च्या राष्ट्रीय उठावाच्यानंतर ब्रिटिशाच्या भारतविषयक धोरणामध्ये महत्वाचा बदल घडून आला. इ.स.1858 मध्ये ब्रिटिश सरकारने भारताचे शासन कंपनीच्या अधिकारामधुन आपल्या अधिकारामध्ये घेतले. तेव्हापासुन संस्थानविषयी धोरणामध्ये मोठा बदल घडून आला. त्यापूर्वी हे संबंध सुनिर्धारीत नव्हते. कारण वेगवेगळया संस्थानाशी विभिन्न परिस्थितीमध्ये वेगवेगळे करार करण्यात आलेले होते. ब्रिटिशांच्या सतत वाढत जाणा-या साम्राज्याचे संस्थानविषयक धोरण विविध परिस्थितीच्या प्रभावावर निर्माण झालेले होते. कधी कधी गव्हर्नर जनरलच्या व्यक्तीगत तत्त्वावर धोरण आधारलेले होते. उदा. वेलस्ली, लॉर्ड हेस्टींग्ज, लॉर्ड डलहौसी यांनी संस्थान विलीनीकरणावर अधिक भर दिला. त्यामुळे संस्थानाची स्थिती 'बळी तो कान पिळी' याप्रमाणे झाली होती.

ब्रिटिशांच्या संस्थानविषयक धोरणाचे स्पष्ट रूप विलीयम ली वार्नर यांच्या 'भारताची देशी संस्थाने' या पुस्तकामध्ये दिसून येते. त्यामध्ये त्यांनी संस्थानविषयक धोरणाचे तीन कालखंड सांगितले. ''इ.स.1751 ते इ.स.1813 पर्यंत 'संरक्षणात्मक कुंपनाचे धोरण', 'इ.स.1813 ते इ.स.1857 पर्यंत 'मांडलीक राज्याची परस्परांपासून विलगना' आणि 'इ.स.1858 ते इ.स.1919 पर्यंत 'मांडलिक राज्याची एकता' या धोरणाचा पुरस्कार केला.''[1] संस्थानाकडून अधिकाधिक लाभ मिळविण्याचे धोरण कंपनीच्या काळामध्ये राबविण्यात आले. त्याविषयी इ.स.1841 मध्ये कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनी ''जास्तीत जास्त प्रदेश प्राप्तीसाठी व महसुल प्राप्तीसाठी कोणतीही संधी न गमाविणे.''[2] हे कंपनीचे उद्दिष्ट होते. त्याकरीता लॉर्ड डलहौसीने या उदिष्टाची उच्च पातळी गाठली. परंतु 1857 मध्ये झालेल्या उठावानंतर ब्रिटिशांना या धोरणात बदल करावा लागला.

## KEYWORDS

1857, राष्ट्रीय उठाव , विलीयम ली वार्नर , भारतीय संस्थान , 'फोडा आणि राज्य करा'

# RESEARCH PAPER

मांडलीकत्वाच्या नात्याने ऐक्य :

उठावानंतर संस्थानविषयक धोरणामध्ये केलेला बदल संस्थानांना इतर भारतीयापासून वेगळे करणे आणि वेळप्रसंगी त्यांची मदत प्राप्त करणे यावर आधारलेले होते. म्हणजेच 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाचा एक भाग होता, असे म्हणता येते. याविषयी कॅनिंगने चार्ल्स वुड यांना लिहिले, ''ऐतदेशीयांना चुचकारण्याची एवढी योग्य संधी आपणाला कधीच आली नव्हती. जर इंग्लंडमध्ये अडचणी आल्या आणि येथून सैन्य हलविले, तर त्या परिस्थितीत आपण शक्य तितक्या ठिकाणी हमी, तारण, आसरा निर्माण केला पाहिजे.''[3].तसेच उठावामध्ये मुस्लीमांचा सहभाग अधिक होता, अशी ब्रिटिशांची धारणा होती. त्यामुळे मुस्लीमांच्या धार्मिक उठावाचा सामना करण्याची वेळ ब्रिटिशांवर येईल अशी भीती त्यांना वाटत होती. कारण याचवेळी आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये ब्रिटिशांचे तुर्कस्थान, इराण, अफगाणीस्थान या मुस्लीम राष्ट्रांशी मतभेद होते. त्यामुळे संस्थानिकांना जवळ करण्याच्या धोरणाला कॅनिगंने सुरूवात केली. त्याविषयी त्याने वुड यांना म्हटले की, ''जमीनदार व संस्थानिक यांच्यामध्ये आपणाविषयी बांधीलकी निर्माण करण्यास व ब्रिटिश सत्तेचा -हास त्यांना जराही फायद्याच्या नसल्याचे त्यांच्या मनावर बिंबवीण्यास इंग्रजांनी जराही दिरंगाई करू नये. या एकाच उपायाने अंतर्गत प्रक्षोभ व बाहेरील धमक्या यांच्यापासून ब्रिटिश साम्राज्य सुरक्षित राहील. कारण धर्मवेडेपणापेक्षाही ऐहिक लाभाचा विचार प्रबल ठरेल.''[4] या धोरणाच्या अंमल बजावणीची संमती मागीतली, त्यामुळे याच धोरणाची घोषणा इ.स.1858 च्या राणीच्या जाहिरणाम्यामध्ये समाविष्ट होती. त्यामध्ये म्हटले की, ''आम्ही अशी घोषणा करतो की, हिन्दुस्थानातील सर्व राजे रजवाड्याशी व संस्थानिकांशी कंपनीने केलेले करार आणि तहनामे आम्हाला पुर्णपणे मान्य असून ते आम्ही काटेकोरपणे पालन करू. दुस-या पक्षानेही त्याचे पालन करावे, अशी आमची अपेक्षा आहे. सध्या असलेल्या आमच्या ताब्यातील प्रदेशात अधिक भर घालण्याची आमची इच्छा नाही. त्याचप्रमाणे आमच्या राज्यावर दृष्ट हेतूने आक्रमण करण्याचा केलेला प्रयत्न चालू देणार नाही. आम्ही शेजारील राज्याचे संस्थानिकांचे अधिकार व मोठेपणा याचा सन्मान करू, आमची अशी अपेक्षा आहे की, त्यांनी आणि आमच्या प्रजेने सुखी, सामाजिक प्रगतीचा आनंदाने उपभोग घ्यावा, त्यासाठी अंतर्गत शासनात शांतता व सुव्यवस्था राखावी.''[5]

वरील जाहिरणामाच्या घोषणेवेळी भारतात एकूण ''क्षेत्रफळाच्या 2/5 प्रदेश, व एकूण लोकसंख्येच्या 1/5 लोक संस्थानामध्ये राहत होते. यावेळी भारतात 567 संस्थाने निरनिराळया भागात अस्तित्वात होती.''[6] या संस्थांनांना राणीच्या आश्वासनानूसार ''कॅनिंगने इ.स.1860 मध्ये संस्थानिक राज्यांना सनदा बहाल केल्या.''[7] त्यानूसार संस्थानिकांना दत्तक घेण्याला परवानगी देण्यात आली. शासनात अव्यवस्थता आली, किंवा राजनिष्ठेला तडा गेल्यास संस्थान जप्त करण्याचा अधिकार सार्वभौम सत्तेला असेल, आणि राजकारभारावर देखरेख करण्यासाठी सरकारी दिवान व रेसिंडन्सीची नियुक्ती करण्यात येईल असे सांगण्यात आले. त्यामुळे इ.स.1858 नंतरही संस्थाने ब्रिटिश शासनासमोर असाह्याय होती. ते पुढील उदाहरणावरून दिसून येते. इ.स.1874 मध्ये बडोद्याच्या मल्हारराव गायाकवाडावर कुप्रशासनाचा आक्षेप करण्यात आला. त्यांच्यावरील आरोप सिध्द न होताच त्याला पदावरून दूर करण्यात आले. व सयाजीराव नावाच्या बालकाला गादीवर बसविले. तसेच मणीपूरमध्ये निर्माण झालेल्या गृहकलहाने सप्टेंबर 1891 मध्ये पाच वर्षाच बालकाला शासक घोषीत केले. इ.स.1857 च्या पूर्वी याच कारणाकरीता अवध, पंजाब, कुर्ग राज्य खालसा करण्यात आले होते. परंतु यावेळी बडोदा व मनिपूर खालसा केले नाही. म्हैसुरचे राज्य पन्नास वर्षाच्या अधिपत्त्यानंतर इ.स.1881 मध्ये तेथील संस्थानिकाला परत केले. म्हणजेच संस्थानिकामध्ये ब्रिटिशांविषयी विश्वास निर्माण करण्यासाठी वरील प्रमाणे प्रयत्न करुन संस्थाने भारतीयांच्या वचर्स्वाखाली ठेवण्यात आली.

सुरूवातीला ब्रिटिश सरकारला संस्थानिकांशी समान दर्जावर करार करावे लागत होते. परंतु ''1876 मध्ये ब्रिटिश संसदेने 'रायल टाइटल्ज' हा कायदा पास केला. त्यानुसार साम्राज्ञी व्हिक्टोरीयाने भारतातील सर्व प्रदेशाची आणि संस्थानाची ''सम्राज्ञी'' ही पदवी धारण केली.''[8] 1 जानेवारी

1877 रोजी भारताची सम्राज्ञी म्हणून पद ग्रहण केले. त्यामुळे भारतातील संस्थाने राणीच्या शासनाच्या अधीन गेली. संस्थान व तेथील प्रजा आता राणीच्या साम्राज्याचा घटक मानण्यात येवू लागली. त्यामुळे संस्थाने स्वतंत्र आहेत. व ती ब्रिटिशांची मित्र आहेत ही स्थिती नष्ट झाली.

भारतातील राजे, सरदार, संस्थानिक, जमीनदार यांच्यामध्ये स्वतंत्र होण्याची स्वाभाविक भावना असणार या भावनेला ब्रिटिशांनी उद्रेकाच्या स्वरूपात पाहिले. त्यामुळे ब्रिटीश सरकारने संस्थानांशी आपले चांगले संबंध निर्माण केले. यामाध्यमातून आपल्या साम्राज्याला मजबूती देण्याचा प्रयत्न केला. याविषयी लॉर्ड लिटनचे विचार पाहणे आवश्यक आहे. त्याने म्हटले की, ''भारतातील अभिजात वर्गाला आपल्या बाजूला करावे, संस्थानिक राजाशी संबंध आणखी चांगले करावे त्यामुळे ब्रिटिश साम्राज्याला मजबूती व सुरक्षितता प्राप्त होईल. त्यामुळे त्याच्या राजनैतिक शक्ती न वाढविता भावनिक समाधान करावे.''[9]

1858 च्या घोषनेनूसार दत्तक घेण्याचा अधिकार संस्थानिकांना देण्यात आला. त्यानूसार सरकारची पूर्वपरवानगी आवश्यक मानली. कंपनीच्या याप्रकारच्या धोरणाचा उपयोग नंतरही करण्यात आला, त्यानुसार इ.स.1884 मध्ये भारतमंत्र्याने म्हटले, ''देशी संस्थानिकातील कोणताही उत्तराधिकारी पात्र समजण्यात येणार नाही. जोपर्यंत तो शासनाकडे मान्यता घेणार नाही.''[10] असेच विचार इ.स.1891 मध्ये सॅलसबरीने व्यक्त केले. त्यानुसार ''कोणताही उत्तराधिकारी शासनाच्या मान्यतेशिवाय पात्र समजण्यात येणार नाही.''[11] अशाच प्रकारचे धोरण एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत ब्रिटिशांनी संस्थानांनविषयी स्विकारलेले दिसुन येते.

1907 ते 1927 हा कालखंड आधुनिक भारताच्या इतिहासात संस्थांनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. या कालखंडात भारताचे भविष्य ठरल्या गेले. त्यामुळे संस्थांनाचा प्रश्न निर्माण झाला. कारण ''भारतात 560 संस्थाने असून भारताचा मोठा भूपद्रेश त्यांनी व्यापला होता, तर एकूण लोकसंख्येच्या 1/4 लोक संस्थानामध्ये राहत होते.''[12] इ.स. 1958 नंतर संस्थाने खालसा करणे बंद झाले. त्यामुळे ब्रिटिशांचे संस्थान विषयक धोरण कोणत्याही तत्त्वावर आधारलेले नसून राजकीय गरजेतून निर्माण झाले होते. इ.स. 1907 नंतर या धोरणामध्ये प्रकर्षाने बदल घडून आला. ब्रिटिशांचा संस्थानावरील रोष कमी होवून त्यांच्यावर कृपादृष्टीची भावना वाढली. याला कारण म्हणजे कॉंग्रेसने निर्माण केलेली ऐक्याची व राष्ट्रवादाची भावना, कर्झनच्या सहानुभूतीशून्य धोरणाविषयीचा असंतोष व त्यामधून निर्माण झालेली बहिष्काराची चळवळ व क्रांतीकारी चळवळी या आहे. यामुळे संस्थानिकांचा पाठींबा मिळविण्याची गरज ब्रिटिशांना वाटत होती.

या बाबी लॉर्ड मिंटो यांनी हेरल्या आणि मुस्लीमांप्रमाणेच संस्थानिकाचे हितसंवर्धन करून त्यांचा स्वार्थ जोपासून त्यांना खुष करण्याचा प्रयत्न मिंटोने केला. या बदलेल्या धोरणाची अभिव्यक्ती अधिकृतपणे इ.स. 1909 च्या उदयपूर येथील भाषणात केली. यावेळी मिंटोने म्हटले की, ''संस्थानिकांना सरसकट सूचना देण्याचे शासन टाळेल, संस्थानिकांच्या संबंधात निर्माण होणा-या प्रत्येक समस्येचा त्या प्रश्नाचे स्वरूप व पूर्वपीठिका, झालेले करार व स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून स्वतंत्रपणे व सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.''[13] यामुळे संस्थानिकांनी ब्रिटिशांना सर्वोतपरी मदत केली. पहिल्या महायुध्दातील मदतीमुळे लॉर्ड हार्डीगने ब्रिटिश सरकारचे सहाय्यक व साथीदार असे म्हटले.

पहिल्या महायुध्दापासून भारतीय राज्य व संस्थाने यांचे मार्ग वेगवेगळे झाले. इ.स. 1917 च्या घोषणेनुसार जबाबदार शासनपध्दतीचा विकास आणि भारताला स्वयंशासन देण्याला ब्रिटीश सरकार वचनबंध झाले. त्यामुळे संस्थाने कॉंग्रेसच्या धोराणाविरोधी शासनाच्या जवळ गेले, आणि झालेल्या करारानुसार अधिकारांची मागणी करीत राहिले.

आपल्या घोषणेनुसार भारतीयांशी चर्चा करण्यास मॉन्टेग्यू भारतात आला. त्यावेळी संस्थानांनी आपल्या समस्या मांडल्या. या समस्येवर मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड अहवालामध्ये सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात आला. त्यानुसार ''संस्थानिकाचे वर्गीकरण करण्यात आले. ज्यामध्ये अंतर्गत प्रशासनात पूर्ण स्वतंत्र असलेले, आणि दुसरे ज्यांना विशेषाधिकारी नाहीत असे, तसेच संस्थानिकामध्ये व ब्रिटीश शासक व संस्थानिक यांच्यातील संघर्षात पक्षपात राहील, न्यायदान असावे याकरीता प्रत्येक पक्षाचा एक प्रतिनिधी असून त्या समितीचा अध्यक्ष उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असावा. त्याचप्रमाणे नरेंद्र मंडळाची स्थापना करण्यात यावी.''[14] ब्रिटीश शासनाची संस्थानाप्रती ही बदललेली नीती होती.

"ब्रिटिश भारतातील राष्ट्रीय चळवळीचा परिणाम शेकडो वर्षापासून संस्थानात पिळवणूक होणा-या जनतेवर झाला. त्यामधून लोकशाही, जबाबदार शासन, जनतेमध्ये राजकीय अधिकाराची जाणीव निर्माण झाली. इ.स. 1920 पासून सुरू झालेले असहकार व खिलाफत आंदोलनाच्या प्रभावाने संस्थानी प्रजाजनाच्या स्थानिक संघटना स्थापण झाल्या. म्हैसूर, हैद्राबाद, बडोदा, काठेवाड, जामनगर, इंदूर, नवानगर, याठिकाणी प्रजामंडळे स्थापण करण्यात आली. याची परिणीती म्हणजे. डिसेंबर 1927 मध्ये अखिल भारतीय संस्थानी प्रजापरीषदेचे आयोजन करण्यात आले."[15] या प्रजापरिषदेला दडपण्यासाठी शासनाने संस्थानिकांना मदत केली. भारताच्या राजकीय सुधारण्याच्यावेळी प्रजापरिषदेला कोणत्याच प्रकारचे महत्त्व दिले नाही.

नरेंद्र मंडळाची स्थापणा :

या बदललेल्या धोरणाने "8 फेब्रुवारी 1921 मध्ये दिल्लीच्या लाल किल्ल्यात दिवान–ए-आम मध्ये डयूॅक ऑफ कॅनाट यांच्या हस्ते नरेश मंडळाच्या स्थापणेचे उद्घाटन करण्यात आले."[16] यापूर्वी लॉर्ड लिटनने प्रीव्ही कॉन्सील निर्मीतीचा सल्ला दिला होता. तसेच लॉर्ड कर्झन व मिंटो यांनी नरेशांची परिषद निर्मितीचा प्रस्ताव सादर केला होता. परंतू त्याला मूर्त स्वरूप इ.स. 1921 मध्ये आले.

नरेश मंडळात 120 सदस्य असून यापैकी 108 सदस्य संस्थानिक होते. तर 12 सदस्य 127 स्थानिकांचे प्रतिनिधी होते. यामध्ये 327 संस्थानाला प्रतिनिधीत्व मिळाले नाही तर म्हैसूर व हैद्राबाद सारखी संस्थाने नरेश मंडळात सहभागी झाली नाहीत.

भारताचा व्हॉईसरॉय नरेश मंडळाचा अध्यक्ष होता. सदस्यांनी निर्वाचीत केलेला उपाध्यक्ष मंडळाचे काम पाहणार होता. उपाध्यक्षाकडे कार्यकारी समितीचे अध्यक्ष पद होते. मंडळाची बैठक वर्षातून एकदा व कार्यकारणीची बैठक वर्षातून दोनदा दिल्लीला आयोजित करण्याचे ठरले. कार्यकारी परिषदेने बैठकीत समान हितसंबंधावर चर्चा करून तो अहवाल मंडळाला सादर करावा. संस्थानिकांना आपसात चर्चा करण्यास यामुळे व्यासपीठ तयार झाले. यामध्ये ब्रिटीश सरकारशी झालेले करारावर चर्चा करण्याचा अधिकार त्यांना नव्हता. या मंडळाला अधिकार जरी कमी होते तरी तो ब्रिटीश शासनाच्या धोरणाचा महत्त्वाचा भाग होता.

विसाव्या शतकाच्या मध्यात भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या मागणीच्या चळवळीला कमकुवत करण्यासाठी संस्थानांचा आधार घेण्याचे प्रयत्न ब्रिटिशांनी केले. त्यामधून इ.स.1942 च्या आन्दोलनानंतर संस्थानाचा स्वतंत्र गट तयार करून स्वातंत्र्याच्या मागणीत अडसर निर्माण करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला. त्रिमंत्री योजनेत भारताच्या विभाजनाचाच प्रयत्न करण्यात आला. ही योजना बारगळली त्यामुळे व्हॉईसरायचा राजकीय सल्लागार कॅनरॉड कोरफिल्ड यांनी लंडनला जाऊन भारतमंत्र्याला सांगितले की, सत्तांतर होईपर्यंत संस्थानावरील सार्वभौमत्व सरकारने सोडू नये. कोरफिल्ड दिल्लीला आल्यावर माउंटबॅटन व त्यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे कोरफिल्डने संस्थानाच्या कारभारविषयक व धोरणाविषयक गुप्त फाईल जाळून टाकल्या. मुस्लीमांचा पाकिस्तान मान्य झाल्यावर संस्थानिकांना फोडून त्याचे अस्तित्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. म्हणजेच संस्थानांना स्वातंत्र्य देवून भारताची राष्ट्रीय एकताच नष्ट करण्याचा प्रयत्न नव्हता, तर या उपखंडात सदैव राजकीय संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न दिसून येतो. हे जगाच्या नंतरच्या इतिहासावरुन दिसुन येते, कारण ब्रिटिश लोकांनी जेथे जेथे आपल्या वसाहती निर्माण केल्या तेथे तेथे असेच संघर्ष निर्माण केलेत. त्याचे विघातक परीणामाने आजही त्या भागातील लोक त्याची किंमत मोजत आहेत.

या योजनेनंतर संस्थानविषयक स्वतंत्र खाती निर्माण करण्यास कोरफिल्ड यांचा विरोध होता. "संस्थानांची एकजूट राहावी हिन्दुस्थान आणि पाकिस्तान यांच्या सरकारी वाटाघाटी करतांना संस्थानाची शक्ती कमी होवू नये यावर कोरफिल्डचा कटाक्ष होता."[17]

कोरफिल्ड व माउंटबॅटन यांची विचारसरणी मुलतः भिन्न नव्हती. कारण माउंटबॅटन यांनी धौलपूर महाराजांना जैसे थे करार करण्याविषयी म्हटले की, "असा करार केल्याने इंग्लंडचे राजे ज्या वसाहतीचे प्रमुख आहेत, त्या वसाहतीचा तुम्ही स्वीकार कराल. पण हिन्दी नेत्यांनी प्रजासत्तांकाची घटना तयार केली. तर हिन्दुस्थानच्या संघात राहायचे की स्वांतंत्र्य राहायचे हे तुमच्यावर अवलंबून राहील."[18]

म्हणजेच माउंटबॅटनला सुध्दा संस्थानिकाचे स्वातंत्र्य मान्य होते. परंतु पं. नेहरू यांनी सर अलादी कृष्णस्वामी अय्यर या कायदेपंडिताचे संस्थानच्या अस्तित्वासाठी मत घेतले. त्यावर अय्यर यांनी म्हटले की, ''बहुतेक संस्थाने पूर्वी मोघल, मराठे, शीख राजांच्या वर्चस्वाखाली होते. परराष्ट्राशी स्वतंत्र करार करण्याचा त्यांना अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जा नव्हता. त्यांचे स्वातंत्र्य अस्तित्व मान्य करता येत नाही.''[19] त्यामुळे माउंटबॅटन यांनी अधिक हस्तक्षेप करण्याचे सोडून दिले आणि स्वातंत्र्यापूर्वी मोठ्याप्रमाणात संस्थाने भारतात विलीनीकरण करण्याला सुरवात झाली.

म्हणजेच मुस्लीमांना त्यांच्या मदतीच्या मोबदल्यात पाकिस्तान दिल्यानंतर संस्थानिकांना भारताच्या संघराज्यातून वेगळे करून भारताच्या भूमीची अनेक शकले निर्माण करण्याचा डाव ब्रिटिशांचा होता. तसेच रशियाच्या साम्यवादाच्या प्रभावापासून या प्रादेशिक भागाला संरक्षित ठेवण्याच्या कारणाने अशा विखुरलेल्या या उपखंडातील अनेक संस्थानात त्यांना भारत सोडल्यानंतरही हस्तक्षेप करता येणार होता. तसेच संस्थानांना स्वतंत्र राहण्याचा अधिकार देवून त्यांच्या मदतीचा मोबदला दिल्यासारखा होणार होता.

सारांश -

म्हणजेच यावरून असे म्हणता येते की, ब्रिटिशांचे इ.स.1857 नंतर संस्थानविषयक धोरण तत्कालीन परिस्थिती मधून निर्माण झाले होते. हे असले तरीही या धोरणामध्ये 'फोडा आणि झोडा' या धोरणाचाच आधार दिसून येतो. संस्थानिकांना आपल्या बाजूला वळवून इतर भारतातील प्रजेपासून त्यांना वेगळे करण्यात आले. त्यामुळे संस्थांनी प्रजा ब्रिटिशांना आपला स्वामी समजत नव्हती. तसेच संस्थानी प्रजा व ब्रिटिश प्रांतातील प्रजा यांच्यात समान ध्येय्यप्राप्तीसाठी लढण्याचे साधन राहिले नाही. हेच धोरण भारतामध्ये निर्माण झालेल्या राष्ट्रवादी चळवळी विरूध्द उपयोगात आणण्यात आले. अशाप्रकारचे सहकार्य संस्थानिकांनी ब्रिटीश शासनाला अंतीम दिवसापर्यंत होते. त्याचा मोबदला म्हणून त्यांना स्वतंत्र राहण्याचा अधिकार ब्रिटिशांनी भारत स्वातंत्र्याच्या वेळी दिला. यावरून असे दिसून येते की, विसाव्या शतकाच्या सुरूवातीला निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थितीने ब्रिटिशांच्या संस्थानविषयक धोरणात बदल झाला. ज्याप्रमाणे इ.स. 1871 पासून मुस्लीमांना खुष करून राष्ट्रवादाला शह देण्यात आला. त्याचप्रमाणे संस्थानिकांच्या हिताचे रक्षण करून त्यांना राष्ट्रवादाच्या व राजकीय जागृतीच्या प्रवाहापासुन दूर ठेवून सरकारशी बांधून ठेवण्यात आले. त्याप्रमाणे संस्थानिकानाही सरकारला सर्वोतपरी मदत केली. त्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्यावेळी संस्थानिकांच्या मदतीचा मोबदला म्हणून त्यांना राष्ट्रीय ऐक्याच्या विरूध्द विभक्त राहण्याचे स्वातंत्र देण्यात आले.

## संदर्भ


1) महाजन व्ही. डी. 'आधुनिक भारत का इतिहास', एस. चंद. प्रकाशन दिल्ली, 11 संस्करण, 1989, पृ. 696
2) Majumdar. R.C. 'An Advanced History of India', macmillan Asian Historical, Series. 3 edition, 1978. P. 833
3) Gopal. S. 'British Policy in India', Publication The Syndics of the Combridge University Press, Lonndon, 1965, P. 08
4) Ibid. P. 08.
5) सावरकर. वि. दा., '1857 चे स्वातंत्र समर',.प्रकाशक, पाठक सूर्यकांत, प्रकाशन ग्राहकाहित, प्रकाशन पुणे. 2008, पृ. 436
6) वैद्य. सुमन, कोठेकर. शांता, 'आधुनिक भारताचा इतिहास,' साईनाथ प्रकाशन नागपुर, 02 खंड , चौथी आवृत्ती, 2004,पृ. 341.
7) Majumdar. R.C. op. cit. P. 834
8) ग्रोवर. बी. एल. 'आधुनिक भारत का इतिहास', एस. चंद प्रकाशन दिल्ली. 07 संस्करण, 2003, पृ. 205
9) ताराचंद, 'भारतीय स्वतंत्रता आन्दोलन का इतिहास', हिन्दी आवृत्ती 1969, खंड 2 रा, सुचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार पृ. 458
10) Majumdar R.C. op. cit. P. 838
11) Ibid, Page No. 838
12) वैद्य सुमन, कोठेकर शांता., 'आधुनिक भारताचा इतिहास', साईनाथ प्रकाशन नागपुर, खंड 3 रा. 1993, पृ. 253.
13) वैद्य सुमन, कोठेकर शांता., खंड 3 रा, पुर्वोक्त, पृ .347.
14) महाजन. व्ही.डी., पुर्वोक्त, पृ. 706.
15) चंद्र विपीन.,'इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स',मराठी अनूवाद. डॉ. काळे. व्ही. एम., के सागर प्रकाशन. पुणे. 2003., पृ. 423-424
16) महाजन. व्ही.डी., पुर्वोक्त., पृ. 706-707.
17) तळवळकर गोविंद., 'सत्तांतर 1947', मौजप्रकाशन पुणे, खंड 2, 1983, पृ.244
18) कित्ता., पृ.244
19) कित्ता., पृ.244


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief EIJMR, All Rights Reserved.